दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २०३ । बुधवार ६ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## गंभीर गुन्ह्यातील वाहन पुणे शहर पोलिसांच्या स्वाधीन

### शहर वाहतुक शाखेची कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहर वाहतुक शाखेच्या वतीने विशेष नाकाबंदी कारवाई करण्यात संशयितरित्या आढळून आलेले चारचाकी वाहन चौकशी अंती पुणे शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

दि. ५ एप्रिल रोजी शहर वाहतुक शाखेच्या वतीने निलक्रांती चौकात विशेष नाकाबंदी मोहिम राबविण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयित वाहन ध्युदाई विरना क्रमांक एमएच १२ व्ही व्ही ५६३६ थांबून ईचलान मशिनद्वारे तपासणी करण्यात आली असता सदर वाहनावर अर्लट प्राप्त झाला. त्यानुसार तात्काळ पोलिस कारवाई करून वाहन ताब्यात घेण्यात आले. पुढील चौकशी व आवश्यक कायदेशीर कार्यवाई करण्याची जबाबदारी पोलिस कॉ. दिपक सरोदे व पोलिस कॉ. रामराव शिरसाठ यांच्यावर सोपविण्यात आली. चौकशीअंती संबंधित



वाहन नांदेड सीटी पोलिस ठाणे पुणे शहर येथे दाखल भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (२), ३१८ (४), ३१९ (२), ३३६ (२), ३४० (२), ३ (५) अंतर्गत गंभीर गुन्ह्याशी संबंधित असल्याचे आढळून आले. त्यानुसार आज दि. ६ मे रोजी नांदेड सीटी पोलिस ठाणे पुणे शहरचे पोलिस उपनिरीक्षक प्रसाद जोशी यांच्याकडे हे वाहन स्वाधिन करण्यात आले.

सदरची कार्यवाही शहर वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शमुवेल गायकवाड, उपनिरीक्षक मन्सुर सय्यद, उपनिरीक्षक अन्सार शेख, सफौ. रामराव शिरसाट, हवालदार खेडकर, हवालदार जहीर शेख, पो. कॉ. गुंडे, पो. कॉ. दळवी, पो. कॉ. खंडागळे व वॉर्डन इर्फान शेख यांच्या नाकाबंदी पथकाने केली.

## महिला परिचरांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद महिला परिचर संघटनेच्या वतीने आज ६ मे २०२६ रोजी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि थकीत वेतनासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नागरगोजे यांना संघटनेच्या वतीने मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

**थकीत वेतनासाठी संघर्षाची भूमिका**

राज्यभरातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रात कार्यरत असलेल्या अंशकालीन महिला परिचरांना मागील अनेक महिन्यांपासून वेतनासाठी संघर्ष करावा लागत आहे. विशेषतः जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२५ या तीन महिन्यांचे थकीत मानधन अद्याप मिळालेले नाही. यामुळे महिला कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असून, प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन मानधन अदा करावे, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

**प्रशासनाशी सविस्तर चर्चा**




यावेळी सीटूचे जिल्हा समन्वयक कॉम्रेड प्रवीण सोनवणे यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांशी चर्चा करताना प्रशासनाचे कान टोचले. या चर्चेदरम्यान त्यांनी नमूद केले की, संबंधित महिला परिचरांपैकी बहुतेक महिला या एकल महिला आहेत आणि त्या शासनाकडे अत्यंत तुटपुंज्या पगारावर काम करत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने त्यांना पगारासाठी वेठिस धरू नये. याबाबतीत शासनाकडून येणाऱ्या काळात कोणत्याही प्रकारे त्यांच्या वेतनात विलंब करू नये; त्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेलाच व्हावे. तसेच, महिला परिचरांना पगारवाढीच्या संदर्भात केलेल्या घोषणांची अंमलबजावणी तात्काळ करावी, या मुद्द्यांवर त्यांनी सविस्तर चर्चा केली.

संघटनेच्या प्रमुख मागण्या:
संप काळातील जुलै ते सप्टेंबर २०२५

■ पान ४ वर

## पॉलिशच्या बहाण्याने ७५ हजारांचे दागिने लंपास

### भिंगारवाला चौकात ज्येष्ठ महिलेची फसवणूक । दोन महिलांविरुद्ध गुन्हा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील गजबजलेल्या भिंगारवाला चौक परिसरात दागिने पॉलिश करून देण्याच्या बहाण्याने ज्येष्ठ महिलेची फसवणूक करून ७५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संशयितांचा शोध सुरू आहे.

मुंबई येथील रहिवासी मीना अशोक जाधव (वय ५३) या ४ मे रोजी अहिल्यानगर येथे आल्या होत्या. सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास भिंगारवाला चौक परिसरातील पलक ज्वेलर्ससमोर त्या रिक्षामध्ये बसलेल्या असताना दोन अनोळखी महिला त्यांच्या जवळ आल्या. संभाषणातून विश्वास संपादन करत त्यांनी दागिने स्वच्छ करून देण्याची ऑफर दिली. 'दागिने चमकवून देतो' असे सांगत त्यांनी जाधव यांना कानातील कर्णफुले आणि गळ्यातील सोन्याची मोहनमाळ काढण्यास प्रवृत्त केले.

यानंतर हातचलाखी करत आरोपी महिलांनी एका कापडी पुडक्यात बनावट दागिने गुंडाळून ते जाधव यांच्या हातात दिले आणि त्यांच्या अस्सल दागिन्यांसह तेथून पसार झाल्या. काही वेळाने पुडके उघडून पाहिले असता त्यात बनावट दागिने असल्याचे लक्षात आले. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली.

चोरीला गेलेल्या मालामध्ये सुमारे २५ हजार रुपये किमतीची कर्णफुले आणि ५० हजार रुपये किमतीची मोहनमाळ असा एकूण ७५ हजार रुपयांचा ऐवज आहे. या प्रकरणातील संशयितांमध्ये सुमारे ७० वर्षीय वृद्ध महिला आणि ५० वर्षीय महिला यांचा समावेश असून पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महिला पोलीस हवालदार वैशाली पटारे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## जमिनीच्या वादातून पती-पत्नीवर जीवघेणा हल्ला

### नगर तालुक्यातील गुंडेगाव शिवारातील घटना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील गुंडेगाव शिवारात घराच्या जागेच्या कारणावरून दोन गटांमध्ये सुरू असलेल्या वादाने अखेर हिंसक वळण घेतले. या वादाचे रूपांतर थेट हाणामारीत होऊन एका कुटुंबातील पती-पत्नीवर लोखंडी गजाने बेदम मारहाण करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणी जया भरत जगताप यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि आरोपींमध्ये गुंडेगाव शिवारातील पाऊतका वस्ती येथील जागेवरून काही दिवसांपासून वाद सुरू होता. ४ मे रोजी सकाळी दहाच्या सुमारास आरोपींनी फिर्यादींच्या घरी जाऊन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत वाद उकरून काढला. त्यानंतर वाद चिघळत जाऊन लाथाबुक्क्यांनी मारहाण व दमदाटी करण्यात आली.

वादाच्या दरम्यान आरोपी तुषार भोसले याने हातातील लोखंडी गजाने फिर्यादी व त्यांच्या पतीवर हल्ला केला. या हल्ल्यात पती-पत्नी दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.


या प्रकरणी रेणुका पांडुरंग भोसले, संगिता तुषार भोसले, अमोल भोसले, योगेश भोसले, तुषार भोसले व विनोद (पूर्ण नाव अज्ञात) अशा सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली

■ पान ४ वर

## भरधाव थारची रिक्षाला समोरून धडक

### चालक ठार । करंजी घाटात वळणावर नियंत्रण सुटले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर-पाथर्डी मार्गावरील करंजी घाटात पुन्हा एकदा भीषण अपघात होऊन एका निष्पाप जीवाचा बळी गेला आहे. मंगळवार (दि. ५ मे) रोजी दुपारी सुमारे एकच्या सुमारास झालेल्या या अपघातात रिक्षाचालकाचा जागीच मृत्यू झाला. यशवंत बन्सी पुरी (वय ४५, रा. धायरी, पुणे) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महिंद्रा थार ही गाडी नगरहून पाथर्डीकडे जात होती, तर रिक्षा पाथर्डीकडून नगरकडे घाट चढत येत होती. करंजी घाट सुरू झाल्यानंतर गव्हाणे बाबा मंदिराच्या सुमारे २०० मीटर पुढे असलेल्या दुसऱ्या धोकादायक वळणावर थार चालकाला वळणाचा अचूक अंदाज आला नाही. परिणामी, भरधाव वेगातील गाडीने समोरून येणाऱ्या रिक्षाला जोरदार धडक दिली.

या अपघातात रिक्षाचा अक्षरशः चुराडा झाला. रिक्षाचालक यशवंत पुरी गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ नगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची नोंद पाथर्डी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली असून, नातेवाईकांच्या फिर्यादीवरून परळी (जि. बीड) येथील थार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, करंजी घाटात गेल्या काही महिन्यांपासून अपघातांची मालिका सुरूच असून, हा मार्ग अक्षरशः मृत्यूचा सापळा बनत चालला आहे. अरुंद रस्ता, तीव्र वळणे आणि अपुरी सुरक्षितता उपाययोजना यामुळे वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिक आणि प्रवाशांकडून प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, या घाटात वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे हा परिसर 'ब्लॅक स्पॉट' म्हणून ओळखला जाऊ लागला

■ पान ४ वर

## शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महापौरांचे कडक आदेश

### वसंत टेकडी येथे पाहणी करून प्रशासनाला दिल्या सूचना । उन्हाळ्यात नागरिकांची गैरसोय होऊ नये; योग्य नियोजन करण्याचे निर्देश – महापौर ज्योतीताई गाडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरात गेल्या एक महिन्यापासून विस्कळीत झालेल्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, या पार्श्वभूमीवर महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रशासनाला कडक निर्देश दिले आहेत. उन्हाळ्याच्या तीव्रतेत नागरिकांना पाण्यासाठी त्रास होऊ नये, यासाठी तातडीने उपाययोजना करून सुरळीत व मुबलक पाणीपुरवठा करण्याचे आदेश त्यांनी दिले.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी वसंत टेकडी येथे भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करत पाणीपुरवठा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी संबंधित अभियंते व कर्मचाऱ्यांशी चर्चा करत त्यांनी पाण्याचे योग्य नियोजन करण्यावर भर



दिला. पावसाळा सुरू होईपर्यंत उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

यावेळी अभियंता गणेश गाडळकर यांनी माहिती देताना सांगितले की, मागील महिन्यात वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. काही वेळा काही मिनिटे वीज

■ पान ४ वर

## मनपा उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांची अचानक तपासणी

### उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना कडक इशारा; वेळेचे भान ठेवण्याच्या सूचना
### नगरकरांची सेवा हीच आपली जबाबदारी – उपमहापौरांचा स्पष्ट संदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सकाळी १० वाजता अचानक भेट देत गेटवर उभे राहून अधिकारी व कर्मचाऱ्यांची हजेरी घेतली. अचानक झालेल्या या तपासणीमुळे कार्यालयात एकच खळबळ उडाली. उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांनी थेट जाब विचारत पुन्हा उशीर झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला. महापालिकेच्या कामकाजात शिस्त राखणे अत्यंत गरजेचे असून नागरिकांना वेळेत सेवा मिळाली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

यावेळी ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, ''महापालिका ही केवळ नोकरी करण्याचे ठिकाण नाही, तर ती नागरिकांच्या सेवेसाठी असलेली जबाबदारी आहे. प्रत्येक कर्मचारी हा या व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. आपण वेळेवर कामावर आलो नाही, तर त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या कामांवर होतो.



त्यामुळे कामावर एक-दोन तास उशिरा येणे ही गंभीर बाब आहे.

ते पुढे म्हणाले, ''सकाळी पावणे दहा ते सायंकाळी सव्वा सहा या वेळेत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियमित उपस्थित राहून आपले काम प्रामाणिकपणे पार पाडावे. नागरिकांना त्यांच्या कामासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागतात, ही स्थिती बदलणे आवश्यक आहे. प्रत्येकाने वेळेचे भान ठेवून जबाबदारीने काम केल्यास महापालिकेची प्रतिमा उंचावेल.

''महापालिकेबद्दल आपले कर्तव्य ओळखा. नागरिकांना चांगली, जलद आणि पारदर्शक सेवा देणे हेच आपले ध्येय असले पाहिजे. यापुढे कोणताही कर्मचारी विनाकारण उशिरा येताना आढळल्यास त्याच्यावर नक्कीच कारवाई केली जाईल,'' असा कडक इशाराही त्यांनी दिला.

## दै. आकर्षण निवडक

### वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा करुन पर्यावरण संवर्धनाला हातभार



अहिल्यानगर - पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वाढदिवस साजरा करण्याची एक प्रेरणादायी उपक्रम हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य सातत्याने राबवित आहेत. ग्रुपचे सदस्य सर्वेश सपकाळ यांनी आपला मुलगा ईवानचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा केला. ''एक वाढदिवस एक वृक्ष'' हा संदेश समाजात पोहोचत असून, लावलेल्या झाडाच्या संवर्धनाची जबाबदारी देखील घेतली जात आहे.भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये ईवान सपकाळ यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातंर्गत अनेक सदस्यांनी लावलेल्या झाडांमुळे परिसर हिरवाईने बहरले आहे. वृक्षारोपणानंतर रोकडेश्वर मंदिर येथे गरजू नागरिकांना मिष्टान्न भोजनाचे वाटप करून सामाजिक बांधिलकीही जपण्यात आली.या प्रसंगी उद्योजक कमलेश झंवर, डॉ. दमन काशीद, सचिन परदेशी, हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, अशोक दुसुंगे, अभिजीत सपकाळ, अशोक पराते, सतीश सपकाळ, जहीर सय्यद, मुन्ना वाघस्कर, दीपक धाडगे, मनोहर दरवडे, संपत बेरड, जैद सय्यद, नवनाथ वेताळ, शामराव वाघस्कर, रमेश भिंगारदिवे, ओम साळवे, प्रशांत भिंगारदिवे, जीआन सय्यद, शैलेश यादव तसेच प्रांजली सपकाळ, शिल्पाताई दुसुंगे, संगीता सपकाळ, तृप्ती यादव, आर्या यादव, शिल्पाताई झंवर, माधवी माळगे, भाग्यश्री सपकाळ, महिमा माळगे आदी मान्यवर उपस्थित होते. संजय सपकाळ म्हणाले की, आजच्या काळात पर्यावरणाचे संतुलन राखणे ही अत्यंत गरजेची बाब आहे. आजच्या पिढीने पर्यावरणाचे रक्षण केल्यास, पर्यावरण त्यांच्या भावी पिढ्या सुरक्षित करेल. वाढदिवसासारख्या आनंदाच्या क्षणी जर आपण एक झाड लावले, तर तो आनंद समाजासाठीही उपयुक्त ठरतो. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून आम्ही केवळ वृक्षारोपणच करत नाही, तर त्या झाडांचे संगोपन करण्याची जबाबदारीही स्वीकारतो. भविष्यात अधिकाधिक लोकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, हीच अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

### शहरात भोंदूशाही आणि मानसिक गुलामगिरीविरोधात बुटांजली सत्याग्रह

अहिल्यानगर - पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा खरा इतिहास जनतेपर्यंत पोहोचविणाऱ्या गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाला महाराष्ट्र दिनानिमित्त 'राष्ट्रीय जनलोक क्रांती ग्रंथ' म्हणून घोषित करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर हुतात्मा स्मारक येथे भोंदूशाही व मानसिक गुलामगिरीविरोधात ''जनलोक बुटांजली सत्याग्रह'' करण्यात आला.चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मृतीस्थळी अभिवादन करून या आंदोलनाची सुरुवात झाली. या वेळी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीरबहादूर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, विजय शिरसाठ, दिलीप साळवे, बाळासाहेब पालवे, निवृत्ती मैड, शंकर साळवे, अशोक भोसले, यशवंत लवटे, पोपट भोसले, रविंद्र केदार, अशोक केदार, संदीप साळवे, निलेश साळवे, विलास साळवे आदी उपस्थित होते.समाजात धर्माच्या नावाखाली जातीय द्वेष पसरविणाऱ्या प्रवृत्तीविरोधात नागरिकांनी प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारत निषेध व्यक्त केला.

# मिलिंद कुलकर्णी यांचा सेवापूर्ती सोहळा समर्थ प्रशालेत संपन्न



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेतील प्रयोगशाळा परिचर श्री. मिलिंद कुलकर्णी यांनी तब्बल ३६ वर्षांची प्रदीर्घ सेवा पूर्ण करून निवृत्ती घेतली. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त प्रशालेत आयोजित सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सेक्रेटरी मा. श्री. सुरेश क्षीरसागर होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रशालेच्या प्राचार्य तथा मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी मॅडम यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून श्री. मिलिंद कुलकर्णी यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेत त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत संस्थेच्या वतीने त्यांना मानपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांचा सपत्नीक सत्कारही करण्यात आला. तसेच संस्थेच्या चारही शाळांच्या वतीनेही त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेच्या चारही शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर विविध मान्यवरांनी श्री. कुलकर्णी यांच्या कार्याचा गौरव करत आपल्या भावना व्यक्त केल्या. यामध्ये माजी मुख्याध्यापिका सौ. अनघा अत्रे मॅडम, संस्थेचे व्हाईस चेअरमन श्री. श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे खजिनदार श्री. संजय कुलकर्णी, श्री समर्थ विद्यामंदिर सांगळे गल्ली प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. अजय महाजन, माजी प्राथमिक मुख्याध्यापक श्री. दुर्योधन कासार, प्राथमिक मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, प्रशालेतील अध्यापिका सौ. अनुराधा शास्त्री मॅडम, समर्थ सांगळे गल्ली येथील ज्येष्ठ शिक्षिका सौ. शारदा होशिंग, सावेडी उच्च माध्यमिक विभागातर्फे सौ. वर्षा पाठक, माध्यमिक विभागाचे ग्रंथपाल श्री. विष्णू रंगा तसेच श्री. मिलिंद कुलकर्णी यांचे बंधू श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी मनोगते व्यक्त केली.

यावेळी श्री. कुलकर्णी यांची कन्या सौ. ऋतुजा देशपांडे यांनी आपल्या वडिलांविषयी भावनिक मनोगत व्यक्त केले, तर नात कु. विदुला या चिमुकलीने आपल्या आजोबांवर सुंदर कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

अध्यक्षीय भाषणात मा. श्री. सुरेश क्षीरसागर यांनी जुन्या कर्मचाऱ्यांनी केलेले निस्वार्थी कार्य हे नवीन रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी आदर्श ठरावे आणि त्यांनी त्याप्रमाणे आचरण करावे, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उच्च माध्यमिक विभागाच्या प्राध्यापिका सौ. प्राजक्ता केसकर यांनी केले, तर माध्यमिक विभागाच्या शिक्षिका सौ. चैताली नवले यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी श्री. मिलिंद कुलकर्णी यांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार, मंडळाचे उपाध्यक्ष श्री. दीपक ओहळ तसेच संस्थेच्या चारही शाळांचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर श्री. मिलिंद कुलकर्णी यांच्या तर्फे सुरुची भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या भोजनाचा सर्व उपस्थितांनी मनमुराद आस्वाद घेतला.

# सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती,एकता व सेवेचा संदेश -डॉ.विलास मढीकर

**संत रामपाल महाराज यांच्या महाअनुष्ठानिमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद । २३४ भाविकांनी केले रक्तदान**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** संत रामपाल जी महाराज यांनी नेहमीच सेवा कार्याला महत्त्व दिले आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. सध्या रक्ताचा तुटवडा सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. मे महिन्यामध्ये कडक ऊन असल्यामुळे व शिबिरे होत नसल्याने महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत असतो.या कालावधीत सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल जी महाराज यांच्या भक्तांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.संत रामपालजी महाराज सतलोक आश्रम ढवळपुरी अहिल्यानगर महाराष्ट्र सेवा कमिटीचे वतीने रक्तदान शिबिराचे कार्य कौतुकास्पद आहे. संत रामपाल महाराजांच्या भाविकांनी सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती,एकता व सेवेचा संदेश दिला आहे. असे प्रतिपादन जनकल्याण रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर यांनी केले आहे.

सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल महाराज महाअनुष्ठान निमित्त जनकल्याण रक्तकेंद्र व सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिरात २३४ भाविकांनी रक्तदान केले. तसेच सात जोडप्यांचे हुंडामुक्त विवाह लावण्यात आले,ज्याने समाजातील चुकीच्या प्रथा नष्ट करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले.यावेळी महाराष्ट्र,कर्नाटक,आंध्र प्रदेश येथून आलेल्या

लाखो भक्तांनी भंडाऱ्याचा आनंद लुटला.

मुनिंदर धर्मार्थ ट्रस्टने संत रामपाल जी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सतलोक आश्रम, ढवळपुरी, पारनेर, अहिल्यानगर (महाराष्ट्र) येथे हे महा-अनुष्ठानाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाद्वारे शांती, एकता व सेवेचा संदेश लाखो लोकांपर्यंत पोहोचत आहे.सत लोक आश्रम ढवळपुरी महाराष्ट्र सेवादार कमिटीचे या रक्तदानाच्या महान कार्याचा गौरव प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

# श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत बापूसाहेब गायकवाड यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत ज्येष्ठ शिक्षक गायकवाड बापूसाहेब सुखदेव यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित समारंभ अत्यंत भावनिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या मूर्ती पूजनाने करण्यात आली. या प्रसंगी संस्थेचे सेक्रेटरी मा. श्री सुरेश क्षीरसागर सर अध्यक्षस्थानी होते. उपाध्यक्ष मा. श्री दीपक ओहोळ, व्हाईस चेअरमन मा. श्री श्रीपाद कुलकर्णी, खजिनदार मा. श्री संजय कुलकर्णी, सदस्य मा. श्री स्वप्निल कुलकर्णी, मा. श्री सुनील जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य सौ. अनघा अत्रे मॅडम, माजी मुख्याध्यापक दुर्योधन कासार, प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी, पर्यवेक्षक श्री लक्ष्मीकांत कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या चारही शाळांमधील शिक्षक व कर्मचारी, तसेच गायकवाड सरांचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका वसुधा जोशी मॅडम यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात सुरेश क्षीरसागर म्हणाले की, गायकवाड सरांनी आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञानच नाही तर संस्कारांचीही रुजवण केली. त्यांची कार्यनिष्ठा, शिस्त आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी ही सर्व शिक्षकांसाठी प्रेरणादायी आहे.

कार्यक्रमात सहकारी शिक्षक व माजी विद्यार्थ्यांनीही गायकवाड सरांविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. अनेकांनी सरांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या मार्गदर्शनामुळे आयुष्यात घडलेले बदल सांगितले. वातावरणात भावनिक क्षण निर्माण झाले होते.

यावेळी आपल्या मनोगतात गायकवाड बापूसाहेब सुखदेव यांनी सांगितले की, ''शिक्षक म्हणून काम करताना मला विद्यार्थ्यांकडून खूप काही शिकायला मिळाले. संस्थेने दिलेल्या संधीमुळेच मी माझे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडू शकलो. माझ्या सहकाऱ्यांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांचे प्रेम हेच माझे खरे यश आहे.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संकेत शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री सुनील रायकर यांनी केले.

# ग्रीन सिटी मोहिमेला गती; बाबावाडी वस्तीगृहात वृक्षारोपण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र दिनानिमित्त सुरू करण्यात आलेल्या ग्रीन सिटी मोहिमेला शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, या मोहिमेअंतर्गत बाबावाडी वस्तीगृह येथे वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्कार प्राप्त सुनील सकट यांच्या पुढाकारातून हा उपक्रम घेण्यात आला.

पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून, आमदार संग्राम जगताप व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रीन सिटी मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. पर्यावरण संवर्धन आणि शहर हरित करण्याच्या उद्देशाने विविध ठिकाणी वृक्षारोपण उपक्रम राबवले जात आहेत. या मोहिमेचा भाग म्हणून बाबावाडी वस्तीगृह येथे पार पडलेल्या कार्यक्रमात शहर जिल्हा भाजप सचिव डॉ. संदीप पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हा उपाध्यक्ष आनंद राठोड (टायरवाले), प्रीतम आहुजा, वस्तीगृहाच्या अधिक्षका सुमनताई कांबळे, अशोक भोसले, संतोष सिरसाठ यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

सुनील सकट म्हणाले की, ''आजच्या बदलत्या वातावरणात वाढते प्रदूषण आणि घटत चाललेली हरित क्षेत्रे ही गंभीर चिंता बनली आहे.

# ज्येष्ठांचे अनुभवी मार्गदर्शन युवा पिढीसाठी दिशादर्शक – शैलेश मुनोत

**चंद्रकांत गुगळे यांचा पंचाहत्तरीनिमित्त जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने सत्कार**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** समाजातील ज्येष्ठ व्यक्तींकडे असलेली अनुभवाची शिदोरी खूप अमूल्य असते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे नव्या पिढीला आयुष्यात दिशा मिळते. जय आनंद महावीर युवक मंडळाच्या यशस्वी रौप्य महोत्सवी वाटचालीत अशा ज्येष्ठांचे मार्गदर्शन नेहमीच दिशादर्शक राहिलेले आहे. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले चंद्रकांत गुगळे हे मंडाळासाठी नेहमीच हक्काचे मार्गदर्शक राहिले आहेत. त्यांचे मंडळाच्या सामाजिक कार्यात नेहमीच संक्रांत योगदान असते. जैन समाजातील पूर्वापार चालत आलेल्या परंपरा, रितीरिवाज याची त्यांना पुरेपूर माहिती आहे. समाजातील युवा पिढीने धार्मिकतेकडे वळले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. जैन ओसवाल पंचायत सभेचे माजी विश्वस्त म्हणून त्यांनी समाजासाठी भरीव योगदान दिले आहे. त्यांची पंचाहत्तरी साजरी करताना विशेष आनंद होत आहे, असे प्रतिपादन जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी केले.

नगरमधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत गुगळे यांचा ७५ व्या वाढदिवसानिमित्त नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शैलेश मुनोत बोलत होते. याप्रसंगी मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, सत्येन मुथा आदी उपस्थित होते.

चंद्रकांत गुगळे म्हणाले की, जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वाटचालीचा मी स्थापनेपासून साक्षीदार आहे. अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी समविचारी मंडळींनी एकत्र आणून एक मोठे सामाजिक कार्य मंडळाच्या माध्यमातून चालविले आहे. गणेशोत्सवापासून विविध सण उत्सव चांगल्या पद्धतीने साजरे करतानाच मंडळाने समाजासाठी अनेक पथदर्शी उपक्रम राबविले आहेत. आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या विचारांचा मोठा पगडा मंडळाच्या प्रत्येक सदस्यावर आहे. दरवर्षी आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त मंडळातर्फे महाभोजन आयोजित करण्यात येते. हजारो भाविक याचा लाभ घेतात. सर्व सदस्य साधूसंतांची सेवा करण्यात अग्रेसर असतात.

# गृहउद्योगातून महिलांची आर्थिक उन्नती शक्य - संध्या मेढे

**कल्याण रोड अनुसया नगर येथे महालक्ष्मी महिला मंडळाचा महिला सक्षमीकरणाचा उपक्रम; रोजगार निर्मिती व गृहउद्योगाचे उद्घाटन संपन्न**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सर्वसामान्य कुटुंबातील महिलांच्या हाताला काम मिळावे, त्यांना स्वावलंबी बनवावे आणि घराघरात लघुउद्योगांची उभारणी व्हावी या उद्देशाने कल्याण रोड, अनुसया नगर येथील महालक्ष्मी महिला मंडळाच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त महिला सक्षमीकरण, रोजगार निर्मिती व गृहउद्योग उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या उपक्रमामुळे परिसरातील महिलांसाठी स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला झाला आहे.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या संध्या मेढे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ''प्रत्येक महिलेमध्ये काहीतरी करण्याची क्षमता असते. फक्त तिला संधी आणि योग्य दिशा मिळणे गरजेचे आहे. गृहउद्योगाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होऊ शकते आणि त्या आपल्या कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करू शकतात.'' त्यांनी महिलांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या उत्पादनांचे



मार्केटिंग करावे आणि स्वतःचा ब्रँड निर्माण करावा, असेही आवाहन केले.

या उपक्रमासाठी सीमा शिंदे यांनी पुढाकार घेत परिसरातील महिलांना एकत्र करून रोजगार निर्मितीचे काम उभे केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक महिलांना प्रत्यक्ष रोजगाराची संधी मिळणार असून कुटुंबाच्या उत्पन्नात हातभार लागणार आहे. महिलांच्या पाठीशी उभे राहून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम ॲडव्होकेट युवराज शिंदे यांनी केले असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमाला रेश्माताई आठरे, सीमा शिंदे यांच्यासह परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. रेश्माताई आठरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''महिलांसाठी शासनाच्या अनेक योजना उपलब्ध आहेत, मात्र त्यांची माहिती सर्वांपर्यंत पोहोचत नाही. महालक्ष्मी महिला मंडळाच्या माध्यमातून ही दरी कमी करण्याचे काम केले जाईल.'' त्यांनी महिलांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर गृहउद्योगात यश मिळवावे, असा विश्वास व्यक्त केला.

सीमाताई शिंदे यांनी सांगितले की, ''कल्याण रोड परिसरातील सर्वसामान्य महिलांच्या हाताला काम मिळावे, यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांपासून सामाजिक, धार्मिक व विकासात्मक उपक्रम राबवत असताना महिलांसाठी काहीतरी ठोस काम करण्याची गरज जाणवत होती. त्यातूनच गृहउद्योग व रोजगार निर्मितीचा हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.'' त्यांनी पुढे सांगितले की, येत्या काळात अधिकाधिक महिलांना या उपक्रमात सहभागी करून त्यांना स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरात १० मे रोजी खुल्या गटातील ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन



अहिल्यानगर - जिल्ह्यातील खेळाडूंसाठी अहमदनगर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने खुल्या गटातील (पुरुष व महिला) मैदानी ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, १० मे रोजी सकाळी ७:३० वाजता वाडिया पार्क येथील जिल्हा क्रीडा संकुलात होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेत १६ वर्षे पूर्ण झालेल्या पुरुष व महिला खेळाडूंना सहभागी होता येणार असून, जिल्ह्यातील सर्व इच्छुक खेळाडूंना मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धेत प्रथम दोन क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंची पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. ही राज्यस्तरीय स्पर्धा ३१मे ते २जून या कालावधीत पुणे विद्यापीठ पुणे येथे आयोजित केली जाणार आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेत मिळणारे राज्य गुणवत्ता प्रमाणपत्र हे नोकरीत ५ टक्के आरक्षणासाठी उपयुक्त ठरणार असून, राज्य व जिल्हास्तरीय सहभाग प्रमाणपत्र आर्मी भरतीसाठी देखील फायदेशीर ठरणार आहे. त्यामुळे खेळाडूंसाठी ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना आपली प्रतिभा दाखवण्याची संधी मिळणार असून, राज्यस्तरावर झेप घेण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.स्पर्धेसाठी ऑफलाईन प्रवेश अर्ज स्पर्धेच्या दिवशी सकाळी ७:०० वाजेपर्यंत स्वीकारले जाणार आहेत. सहभागी खेळाडूंनी आपले मूळ आधार कार्ड सोबत आणणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच भाला फेक आणि हातोडा फेक स्पर्धेत भाग घेणाऱ्या खेळाडूंनी स्वतःचे साहित्य (भाला व हातोडा) सोबत आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी दिनेश भालेराव (९२२६२३८५३६), राहुल काळे (८८३०८६३११६) आणि संदीप हारदे (९६५७६०३७३२) यांच्याशी संपर्क साधण्याचे सांगितले आहे.

### अहिल्यानगरमध्ये 'डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूट' व कराळे क्लब चा 'समर कॅम्प २०२६'




अहिल्यानगर- विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुट्ट्यांचा सदुपयोग व्हावा आणि त्यांच्यातील विविध कौशल्यांचा विकास घडावा या उद्देशाने डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूट व कराळे क्लब यांच्या वतीने 'समर कॅम्प २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. हा कॅम्प दि. १० मे २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीत कराळे क्लब हाऊस, न्यू लिंक रोड, सावेडी बसस्थानकाजवळ येथे होणार आहे. या समर कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रांतील उपक्रमांचा समावेश करण्यात आला असून शारीरिक, मानसिक, सामाजिक व सर्जनशील विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. 'फिटनेस झोन' अंतर्गत डान्स फिटनेस, झुंबा, स्ट्रेंथ अँड फ्लेक्सिबिलिटी ट्रेनिंग, मजेदार वर्कआउट चॅलेंजेस, ब्रेन जिम तसेच योग, ध्यान व रिलॅक्सेशन यांचा समावेश आहे. 'सोशल अँड लाईफ स्किल्स झोन'मध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी उपक्रम, सार्वजनिक वक्तृत्व व स्टोरीटेलिंग, टीम बिल्डिंग, सोशल मीडिया अवेअरनेस, मनी मॅनेजमेंट बेसिक्स आणि शिस्त व एकाग्रता वाढविण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच 'आर्ट अँड क्रिएटिव्ह झोन'मध्ये ड्रॉइंग, पेंटिंग, पेपर क्राफ्ट, मोजॅक आर्ट, टाय अँड डाय, फॅशन डिझाईनिंग, स्क्रॅपबुक आणि विविध सर्जनशील प्रकल्पांचा समावेश आहे. 'गेम्स अँड ॲडव्हेंचर झोन'मध्ये इनडोअर-आउटडोअर खेळ, ॲडव्हेंचर डे, निसर्गभ्रमंती तसेच पूल पार्टी व अक्का डान्ससारखे आकर्षक उपक्रम ठेवण्यात आले आहेत. याशिवाय 'फन अँड एंटरटेनमेंट झोन'मध्ये रील मेकिंग वर्कशॉप, अभिनय व अभिव्यक्ती खेळ, टॅलेंट शो, थीम डे ॲक्टिव्हिटीज आणि दररोज वेगवेगळ्या मजेदार स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. सध्या कॅम्पसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू असून पालक व विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

ऐतिहासिक चौंडी मंत्रिमंडळ बैठक वर्षपूर्ती लेख

# अहिल्यानगरच्या समग्र परिवर्तनाचे यशस्वी वर्ष

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून ६ मे २०२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी (ता. जामखेड) येथे राज्याच्या मंत्रिमंडळाची ऐतिहासिक विशेष बैठक पार पडली. जिल्ह्याचे अहिल्यानगर असे नामकरण झाल्यानंतर ग्रामीण भागात झालेली ही पहिलीच उच्चस्तरीय बैठक प्रशासकीय विकेंद्रीकरणाचा आदर्श वस्तुपाठ ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि चौंडीचे सुपुत्र तसेच राज्याच्या विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून साकारलेला ६८१.३२ कोटींचा चौंडी विकास आराखडा आज खऱ्या अर्थाने जमिनीवर उतरत आहे. या ऐतिहासिक निर्णयाला वर्ष पूर्ण होत असताना, या प्रवासातील महत्त्वाच्या टप्प्यांचा आणि विकासकामांच्या सद्यस्थितीचा हा वेध.

चौंडीच्या या पावन भूमीचा सर्वांगीण विकास व्हावा, ही प्रा. राम शिंदे यांची अनेक वर्षांपासूनची भूमिका होती. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच ६८१ कोटींच्या बृहत् आराखड्याला प्रशासकीय मान्यता मिळाली. हा प्रकल्प केवळ एक वास्तू नसून, तो अहिल्यादेवींच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव करणारा जागतिक दर्जाचा सांस्कृतिक वारसा ठरणार आहे. ३१ मे २०२८ पर्यंत हा संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे शासनाचे उद्दिष्ट असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत याच्या अंमलबजावणीवर कडक देखरेख ठेवली जात आहे.

या ऐतिहासिक विकास आराखड्यातील पहिल्या टप्प्यात सुमारे १५४ कोटी रुपयांच्या कामांची निविदा व स्थापत्य सल्लागार नेमणुकीची प्रक्रिया मार्गी लागून अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. याअंतर्गत अहिल्यादेवींच्या जीवनकार्यावर आणि त्यांच्या अद्वितीय शासनपद्धतीवर प्रकाश टाकणारे अद्ययावत संग्रहालय साकारण्यात येत आहे. सोबतच, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सादरीकरणासाठी ओपन-एअर थिएटर उभारले जात आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या पर्यटकांसाठी सर्व सोयी-सुविधांनी युक्त पर्यटन सुविधा केंद्र उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून, यात पार्किंग, विश्रामगृह आणि स्थानिक उत्पादनांच्या विक्रीसाठी दालने उपलब्ध होणार आहेत.

चौंडी विकास आराखड्यातून केवळ स्मारकाचा विकास अभिप्रेत नसून, या परिसराचा सर्वांगीण कायापालट करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच धर्तीवर सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागामार्फत ४१० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांची कामे प्रस्तावित असून त्यांची निविदा प्रक्रिया वेगवेगळ्या टप्प्यांत सुरू आहे. यामध्ये चौंडीला जोडणाऱ्या मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण (अंदाजे ३६० कोटी तरतूद) आणि परिसरातील पाणीटंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी सीना नदीवर दोन बुडीत बंधारे उभारण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचा समावेश आहे. यामुळे शेतीला शाश्वत पाणी मिळून नदीकाठच्या गावांचा कायापालट होणार आहे. चौंडीचा विकास केवळ पर्यटनापुरता मर्यादित न ठेवता, स्थानिक अर्थकारणाला व रोजगाराला गती देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी सूतगिरणीला शासनाकडून १३ कोटी २० लाख रुपयांचे भागभांडवल आणि १७ कोटी ७० लाख रुपयांचे दीर्घमुदतीचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागात सहकार आणि औद्योगिक विकासाला चालना मिळून स्थानिकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

अहिल्यादेवींच्या कार्याचा प्रचार-प्रसार जगभरात व्हावा, या उद्देशाने त्यांच्या जीवनचरित्रावर आधारित बहुभाषिक चित्रपटाच्या निर्मितीसाठी शासनाने १ कोटी रुपयांची विशेष तरतूद केली आहे. याशिवाय, आरोग्य क्षेत्रात मोठी भर म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यासाठी मंजूर झालेले १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांचे संलग्न रुग्णालय. ४८५.०८ कोटींच्या या प्रकल्पासाठी ४४८ पदांच्या निर्मितीचा अध्यादेश काढण्यात आला असून, जिल्हा सामान्य रुग्णालयाची जागा व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. पुढील वर्षापासून येथे प्रवेश प्रक्रिया सुरू होणे अपेक्षित आहे.

तसेच, हाळगाव (ता. जामखेड) येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषी महाविद्यालयात नव्या सभागृहाच्या उभारणीला नुकतीच प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, ज्यामुळे विद्यार्थी व शेतकऱ्यांसाठी मोठी सोय होणार आहे.

चौंडी येथील मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेले निर्णय केवळ कागदावर मर्यादित न राहता, वेगाने जमिनीवर उतरत आहेत. प्रगत आरोग्य सेवा, दर्जेदार पायाभूत सुविधा, औद्योगिक सक्षमीकरण आणि ऐतिहासिक वारशाचे जतन या चतु:सूत्रीमुळे अहिल्यानगर जिल्हा राज्याच्या विकास नकाशावर ठळकपणे उमटला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खंबीर नेतृत्व आणि प्रा. राम शिंदे यांचा ध्येयवादी पाठपुरावा यांमुळेच चौंडीसह संपूर्ण जिल्ह्याचा हा कायापालट शक्य झाला आहे.

साईनामाच्या गजरात भक्तीची दिंडी

# १७ वर्षांची परंपरा जपणारे रामदास कावरे यांचे प्रेरणादायी कार्य

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** हिवरे कोरडा येथून दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री क्षेत्र शिर्डीकडे निघालेल्या पायी दिंडी सोहळ्याला भक्तिमय वातावरणात उत्साहात प्रारंभ झाला. ''साईराम''च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला असून हजारो भाविकांनी श्रद्धेने दिंडीत सहभाग नोंदवला आहे.

दिनांक ६ मे रोजी सायंकाळी पांडुरंग मंदिर येथून साईबाबांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर दिनांक ७ मे रोजी सकाळी ७ वाजता पांडुरंग मंदिरातून दिंडीचे विधिवत प्रस्थान करण्यात आले.

या दिंडी सोहळ्याचे आयोजन साईभक्त रामदास कावरे व सौ. रत्नमाला कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे. दिंडीदरम्यान साई नामस्मरण, भजन आणि कीर्तन यांच्या माध्यमातून संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे.

विशेष म्हणजे, रामदास कावरे यांनी हिवरे कोरडा येथून साईबाबांची पायी दिंडी सुरू करून आज तब्बल १७ वर्षांची अखंड परंपरा जपली आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि निस्वार्थ कार्यामुळे संपूर्ण हिवरे कोरडा परिसरात भक्तीची भावना अधिक दृढ झाली आहे. गावासह परिसरातील हजारो भाविकांना त्यांनी या दिंडीच्या माध्यमातून एकत्र आणत साईभक्तीचा सुंदर वारसा निर्माण केला आहे. हिवरे कोरडा तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले असून श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाच्या जोरावर शिर्डीपर्यंतचा हा पायी प्रवास पार पाडला जाणार आहे. या उपक्रमामुळे परिसरात धार्मिक ऐक्य, उत्साह आणि भक्तीभावाची अनोखी परंपरा रुजली असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## पैठणच्या डीएड कॉलेजमध्ये प्राचार्य-प्राध्यापकांचा तुटवडा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** मराठवाड्यातील जुने आणि नावाजलेले शासकीय अध्यापक विद्यालय (डीएड कॉलेज) सध्या प्राचार्य व प्राध्यापकांच्या अभावामुळे चर्चेत आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून येथे पूर्णवेळ प्राचार्य तसेच विविध विषयांचे प्राध्यापक उपलब्ध नसल्याने प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

या महाविद्यालयातून आतापर्यंत शेकडो विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शिक्षक म्हणून घडले; मात्र सध्याच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना नियमित अध्यापनापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, पालक व नागरिकांमध्येही संताप व्यक्त होत आहे.

नाथ कॉलनी येथील या शासकीय अध्यापक विद्यालयात सध्या प्रथम व द्वितीय वर्षात प्रत्येकी सुमारे ४० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र आवश्यक त्या विषयांचे शिक्षकच उपलब्ध नसल्याने अभ्यासक्रम पूर्ण होण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून तातडीने प्राचार्य व प्राध्यापकांची नियुक्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. यासाठी मुख्यमंत्री कार्यालय, उच्च शिक्षणमंत्री, विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांनी हस्तक्षेप करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, खासदार संदिपान भुमरे, खासदार कल्याण काळे, पालकमंत्री संजय सिरसाट तसेच आमदार विलास भुमरे यांनीही या प्रश्नात लक्ष घालावे, अशी मागणी पुढे येत आहे. या संदर्भात लवकरच एक शिष्टमंडळ संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेणार असल्याची माहिती मिळाली आहे.

# नेवासा प्रॅक्टिशनर बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. किशोर ढेरे, तर उपाध्यक्षपदी ॲड. अरविंद काळे यांची बिनविरोध निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**नेवासा फाटा –** नेवासा येथील जिल्हा प्रॅक्टिशनर वकील बार असोसिएशनची नूतन कार्यकारिणी जाहीर झाली असून, अध्यक्षपदी ॲड. किशोर ढेरे आणि उपाध्यक्षपदी ॲड. अरविंद काळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. मागील कार्यकारिणीचा एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने ही निवड प्रक्रिया पार पडली.

निवड प्रक्रिया आणि बिनविरोध निवड निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. राजेंद्र खिळदकर यांनी नूतन कार्यकारिणीसाठी रीतसर नोटीस जाहीर करून निवडणूक वेळापत्रक दिले होते. या प्रक्रियेत अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर पदांसाठी इच्छुकांनी आपले अर्ज दाखल केले होते. मात्र, सर्वानुमते चर्चा होऊन प्रमुख पदांसह संपूर्ण कार्यकारिणीची निवड बिनविरोध करण्यात आली. नूतन कार्यकारिणी



तपशील असोसिएशनच्या विविध जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे सोपवण्यात आल्या आहेत: अध्यक्ष: ॲड. किशोर ढेरे उपाध्यक्ष: ॲड. अरविंद काळेमहिला उपाध्यक्ष: ॲड. अंजली काळे सचिव: ॲड. सचिन सोनवणे सहसचिव: ॲड. विशाल सुरडे खजिनदार: ॲड. शिवाजी शिंदे विश्वस्त: ॲड. भरत वर्मा, ॲड. संजय माकोने आणि ॲड. नामदेव वाघ
नूतन पदाधिकाऱ्यांचे स्वागत

निवड जाहीर होताच असोसिएशनच्या सदस्यांनी आणि ज्येष्ठ वकिलांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी ॲड. नंदकुमार लोंढे, ॲड. बाळासाहेब शिंदे, ॲड. अण्णासाहेब आंबाडे, ॲड. बाळासाहेब गरड, ॲड. योगेश वाघाडे, ॲड. विशाल शिंदे, ॲड. अनिल आगळे यांच्यासह अनेक वकील उपस्थित होते.

ठळक वैशिष्ट्ये: एकता: वकिलांच्या संघटनेने एकीचे दर्शन घडवत बिनविरोध निवडीची परंपरा कायम राखली.पारदर्शकता: निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. राजेंद्र खिळदकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रक्रिया पूर्ण. नवा संकल्प: नूतन कार्यकारिणी वकिलांच्या हितासाठी आणि न्यायालयीन कामकाजाच्या सुलभतेसाठी प्रयत्नशील राहणार. नेवासा वकील संघाच्या या नूतन निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## अहिल्यानगरमध्ये गीता परिवाराच्या संस्कार वर्गांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्वामि गोविंद देव गिरीजी महाराजांनी स्थापन केलेल्या व डॉ. संजयजी मालपाणी कार्याध्यक्ष असणाऱ्या गीता परिवार तर्फे अहिल्यानगरमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांसाठी संस्कार वर्गांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याचे प्रतिपादन अहिल्यानगरच्या गीता परिवाराच्या अध्यक्षा सौ. सुनंदा सोमाणी यांनी केले.

पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी २४ एप्रिल ते तीन मे या कालावधीत शहरातील सहा केंद्रांवर या संस्कार वर्गांचे आयोजन करण्यात आले होते. जवळजवळ २५० विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. यावर्षी संस्कार वर्गाची थीम 'छत्रपती शिवाजी महाराज' ही ठेवण्यात आली होती. वर्गामध्ये मुलांना शिवरायांची गाणी, शिवगर्जना शिकवण्यात आली तसेच शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी कथा सांगण्यात आल्या. शिवाजी महाराजांच्या राजचिन्हांविषयी माहिती देण्यात आली आणि आरती सुद्धा शिवरायांचीच घेण्यात आली. यासोबतच मुलांना संस्कृत श्लोक व भगवद्गीतेचे शिक्षण देण्यात आले. या विषयांवर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

संस्कार वर्गात केवळ धार्मिक व सांस्कृतिक शिक्षणावरच भर न देता मुलांसाठी विविध खेळ, हस्तकला आणि वैज्ञानिक प्रयोगांचाही समावेश करण्यात आला होता. त्यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. समारोप कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना पालकांनी गीता परिवाराच्या कार्यकर्त्यांची समर्पण भावना खरोखरच कौतुकास्पद असल्याचे सांगितले. संस्कार वर्गामुळे मुलांचा स्क्रीन टाईम मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, विविध उपक्रमांमुळे मुले सकारात्मक आणि सर्जनशील कार्यात गुंतली, असेही त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, ते वर्षभर या शिबिराची आतुरतेने वाट पाहत असतात. यावर्षीची शिवाजी महाराजांची थीम विशेष प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरली असल्याचे त्यांनी सांगितले.

या संस्कार वर्गांच्या यशस्वी आयोजनासाठी विविध केंद्रांवर कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम पाहिले. आनंद विद्यालय सकाळच्या केंद्रावर दीपा शर्मा, छाया पडवळ, वर्षा चिखले, हिरा शहापूरे, मंगला गौरीधर, सुनंदा सुपेकर, ऐश्वर्या वंगा, सोनिया आर्डे यांनी कार्य केले. महेशनगर केंद्रावर पूजा बिहाणी, अलका नावंदर, लीला मुंदडा, शिल्पा अट्टल यांनी जबाबदारी सांभाळली. ईचरजबाई प्रशाला केंद्रावर दुर्गा जाजू, दिपा कांबळे, सरला मालपाणी, पूनम बिहाणी, कविता मंत्री, श्रुती गुगळे, संगिता मालपाणी, रोहित तांबोळी, विशाखा जोशी यांनी कार्य केले. रामकृष्ण स्कूल केंद्रावर गीता बिहाणी, वंदना काकाणी, कमल आढाव, दीप्ती खंडेलवाल यांनी वर्ग चालविले. लक्ष्मीनारायण मंदिर केंद्रावर स्वाती सोमाणी, दिपाली काबरा, सविता झंवर यांनी तर आनंद विद्यालय संध्याकाळच्या केंद्रावर प्रतिभा बजाज, अश्विनी कुलकर्णी, रत्नमाला कुलकर्णी, अनुराधा बिहाणी, नलिनी गुर्रम, ज्योती कुलकर्णी, श्रीपाद कुलकर्णी यांनी नियोजनबद्ध पद्धतीने संस्कार वर्गांचे संचालन केले.

एकूणच, गीता परिवाराच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासह त्यांच्यात संस्कार, शिस्त आणि राष्ट्रभक्तीची भावना रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य यशस्वीपणे पार पडले.

# आनंददायी शिक्षणासाठी माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेस लोकसहभागातून शैक्षणिक साहित्य वाटप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत आनंददायी शिक्षणासाठी चेन्नई येथील रामनाथन यांनी लोकसहभागातून विविध शैक्षणिक पाठवले आहे. माथनी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कृतीयुक्त आनंददायी शिक्षणासाठी हे विविध प्रकारचे खेळणीरूप साहित्य जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेतील उपक्रमशील अधिव्याख्याता मुकुंद दहिफळे यांच्या हस्ते नुकतेच विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. या शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनील अडसूळ ,राहुल व्यवहारे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी विद्यार्थ्यांसाठी लोकसहभागातून विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य मिळवले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडचणी दूर झाल्या आहेत. चेन्नई येथील रामनाथन यांचेशी



सुनील अडसूळ यांनी संपर्क साधून विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य मिळविले आहे. यामध्ये विविध शैक्षणिक खेळणी चा समावेश आहे .या खेळणीमध्ये मॅट इट अल्फा न्यूमेरो,मॅच इट मॅच शेप्स,कलर ट्रॅप ,अल्फा न्युमेरिक,कन्स्ट्रक्शन पझल ,रिंगटॉस, मॅग्नेटिक लुडो, सीनियर मॅजिक पेज, बिल्डअप बिकर्स , वार्मअप , स्ट्रॉअसेंबली किट ,ट्रँगल कलर मॅच, पझल्स, शार्पशूट, वुडन टॉवर, स्पीड क्यूब ,प्रोजेक्ट खिलौना अशा अनेक प्रकारच्या साहित्यांचा समावेश आहे. हे साहित्य विद्यार्थी आनंदाने कृतीयुक्तपणे वापर करतात. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा,कल्पनाशक्तीचा, सृजनशीलतेचा विकास होण्यास मोठी मदत झाली आहे. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकास वाढ आनंददायी पद्धतीने होण्यास यामुळे उपयोग झाला आहे .याबद्दल जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, अहिल्यानगर जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर ,डायट मधील सर्व अधिव्याख्याते ,गटशिक्षणाधिकारी तृप्ती ताई कोलते ,विस्तार अधिकारी रवींद्र कापरे,केंद्रप्रमुख भास्कर नरसाळे यांनी अभिनंदन केले आहे

## पैठण : अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीची निवड जाहीर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** तालुक्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी डॉ. भारत झारगड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

समितीच्या कार्याध्यक्षपदी श्री. अंकुशभाऊ काळे, तर उपाध्यक्षपदी श्री. सुनीलभाऊ वीर यांची निवड झाली आहे. नव्याने निवडलेल्या पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली यंदाचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

या जयंती उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी पदाधिकाऱ्यांना सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# सांस्कृतिक क्षेत्रात प्रशालेची घौडदौड कौतुकास्पद - दीपक ओहोळ

## समर्थ प्रशालेचा गिनीजसह पाच जागतिक विश्वविक्रमात सहभाग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला,माध्यमिक विभागाने शैक्षणिक वर्षात केंद्र व राज्य सरकारच्या गिनिजसह पाच विश्वविक्रमी उपक्रमात सहभाग घेतला. महाराष्ट्रदिनी मान्यवरांच्या हस्ते या विविध उपक्रमांच्या माहिती फलकाचे अनावरण करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, सचिव सुरेश क्षीरसागर, प्राचार्या वसुधा जोशी, मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी, प्रयोगशाळा परिचर मिलिंद कुलकर्णी आदी उपस्थित होते. वर्षभरातील या उपक्रमांचे समन्वयक म्हणून दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक डॉ.अमोल बागुल यांनी काम पाहिले.

संस्थेचे कार्यकारिणी सदस्य व शालेय समिती चेअरमन ॲड.किशोर देशपांडे यांचे मार्गदर्शन या उपक्रमांना लाभले. यामध्ये १) शिक्षण मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून आयोजित ''परीक्षा पे चर्चा''२०२४–२५ मध्ये प्रशालेचा सहभाग, २)महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था ''अमृत''च्या वतीने दीपावलीनिमित्त दूर्ग बनवा उपक्रम, ३)भारत सरकारच्या प्रौद्योगिकी व इलेक्ट्रॉनिक मंत्रालयाच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय इंडिया– समीटमध्ये प्रश्नमंजुषा व शपथ उपक्रम, ४)शिक्षण मंत्रालय,भारत सरकारच्या वतीने नॅशनल बुक ट्रस्ट – इंडियाच्या वतीने आयोजित ''शांतता पुणेकर वाचत आहेत–बुक सेल्फी'' उपक्रम– वरील चारही संकल्पनांचा गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश व ५)महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या वतीने २६ जानेवारी–प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित ''राष्ट्रप्रथम'' या देशभक्तीपर गीतांवरील नृत्य कवायत उपक्रम – वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस. या पाच विश्वविक्रमी उपक्रमात सहभाग आहे.

''संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न केले जातात. अभ्यासाबरोबरच इतर विविध आवडत्या क्षेत्रात संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला हातभार लागतो. गिनीजसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर प्रशालेचे नाव झळकते आहे, ही अभिमानाची व आनंदाची गोष्ट आहे .''असे प्रतिपादन संस्थेचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ यांनी केले.

# मोबाईलपासून दूर जाऊन मुलांनी मैदानी खेळांकडे वळावे – वाकळे

## महापौर उद्यानात 'प्रिशा समर कॅम्प'ला उत्साहात प्रारंभ; बालकांमध्ये खेळ व संस्कारांची जोपासना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, टीव्ही आणि डिजिटल साधनांच्या अति वापरामुळे बालकांमध्ये मैदानी खेळांबद्दलची आवड कमी होत चालली आहे. यामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान, सावेडी यांच्या वतीने महापौर उद्यान येथे 'प्रिशा समर कॅम्प'चे आयोजन करण्यात आले असून या शिबिराला उत्साहात प्रारंभ झाला आहे.

या वेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ''सुदृढ व निरोगी जीवनासाठी मुलांनी बालवयातच मैदानी खेळांची सवय लावणे अत्यंत आवश्यक आहे. आजची मुले ही उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य असून त्यांच्यात योग्य संस्कार आणि क्रीडावृत्ती निर्माण करणे काळाची गरज आहे.

या समर कॅम्पच्या माध्यमातून बालकांना केवळ खेळच नव्हे, तर क्रीडा, कला, संस्कृती आणि नैतिक मूल्यांचे धडे दिले जाणार आहेत. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, जिजाऊ मातांचे संस्कार आणि भारतीय परंपरेची ओळख करून देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जाणार आहे.

या शिबिरामध्ये ॲथलेटिक्स, योगा, रोप मल्लखांब, लाठी–काठी, हॉर्स रायडिंग, जिम्नॅस्टिक्स, झिप लाईन, सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग, क्रिकेट, कबड्डी, एरोबिक्स डान्स यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांसोबतच मजेदार खेळ, जादूचे प्रयोग, गोष्टी सांगणे, सहली आणि बालसंस्कार वर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

याशिवाय स्वच्छतेचे महत्त्व, शिस्त, टीमवर्क आणि सामाजिक जबाबदारी याबाबतही बालकांना मार्गदर्शन केले जाणार आहे. या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रमास प्रिया शिरोळे, मोनाली कुलकर्णी तसेच मोठ्या संख्येने बालक, पालक व शिक्षक उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा शिबिरांमुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असल्याची भावना व्यक्त केली.

# पैठणमध्ये सोमवारी मांस–मच्छी विक्री बंद करण्याची मागणी

## भाविकांच्या भावना लक्षात घेऊन निर्णय घ्यावा; नगर परिषदेकडे निवेदन देण्याची तयारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** धार्मिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पैठण शहरात दर सोमवारी मांस व मच्छी विक्री बंद ठेवावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. शहरात येणाऱ्या भाविकांच्या भावना लक्षात घेता हा निर्णय घेणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे.

पैठण हे संत एकनाथ महाराजांची भूमी असून, दररोज मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. विशेषतः सोमवारी मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ अधिक असते. अशा पार्श्वभूमीवर शहरात ठिकठिकाणी सुरू असलेल्या मांस व मच्छी विक्रीमुळे धार्मिक वातावरणावर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, इतर धार्मिक स्थळांप्रमाणे पैठणमध्येही आठवड्यातील एक दिवस मांस–मच्छी विक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्यास शहराच्या पावित्र्याला हातभार लागेल. याबाबत लवकरच नगर परिषद प्रशासनाला निवेदन देण्याची तयारी नागरिक व काही सामाजिक संघटनांकडून सुरू आहे. दरम्यान, या मागणीवर व्यापारी वर्गाची भूमिका महत्त्वाची ठरणार असून, सर्व घटकांचा समन्वय साधत प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# फ्रेंड्स कॉर्पोरेट टी–२० लीगमध्ये नगर डिस्ट्रिक्ट सिनीअर्सची विजयी धडाकेबाज कामगिरी; नगर चॅम्पियनवर मात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फ्रेंड्स कॉर्पोरेट टी–२० लीग स्पर्धेत रविवारी दि ३ मे रोजी पार पडलेल्या सामन्यात नगर डिस्ट्रिक्ट सिनीअर्स संघाने नगर चॅम्पियन संघावर दिमाखदार विजय मिळवत आपली ताकद सिद्ध केली. दोन्ही संघांमधील हा सामना रंगतदार ठरला असून प्रेक्षकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवणारा ठरला.

सामन्यात प्रथम फलंदाजी करताना नगर चॅम्पियन संघाने निर्धारित २० षटकांत ८ गड्यांच्या मोबदल्यात १५२ धावा केल्या. सुरुवातीला सावध खेळ करत त्यांनी मधल्या षटकांमध्ये आक्रमक फटकेबाजी केली आणि प्रतिस्पर्ध्यांसमोर आव्हानात्मक लक्ष्य उभे केले. त्यांच्या फलंदाजांनी योग्य वेळी फटकेबाजी करत संघाला सन्मानजनक धावसंख्या गाठून दिली.

१५३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नगर डिस्ट्रिक्ट सिनीअर्स संघाने आत्मविश्वासपूर्ण सुरुवात केली. सलामीवीरांनी संघाला भक्कम पाया घालून दिला, तर मधल्या फळीतील फलंदाजांनी धावगती कायम ठेवत विजयाची दिशा निश्चित केली. अखेर १७.१ षटकांत ५ गडी गमावत १५५ धावा पूर्ण करत नगर डिस्ट्रिक्ट सिनीअर्स संघाने सहज विजय मिळवला.

या सामन्यातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल मतीन शेख याला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याच्या सर्वांगीण खेळामुळे संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला गेला आणि निर्णायक क्षणी त्याने संघाला विजयाच्या दिशेने नेले.

दरम्यान, स्पर्धेतील सर्व लीग सामने यशस्वीरित्या पूर्ण झाले असून आता उपांत्य फेरीच्या सामन्यांची उत्सुकता वाढली आहे. येत्या काही दिवसांत रंगणाऱ्या उपांत्य सामन्यांमध्ये संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार असून अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी सर्वच संघ सज्ज झाले आहेत. क्रिकेटप्रेमींचे लक्ष आता या निर्णायक सामन्यांकडे लागले आहे.

# शाह यांच्या चाणक्य नीतीचा प्रभाव: छत्तीसगडपासून हरियाणा, महाराष्ट्र, दिल्ली आणि बंगालमध्ये सर्वत्र फुलले कमळ

## ममता बॅनर्जी यांच्या गड भवानीपूरमध्ये अमित शाह यांनी दिली त्यांना मात । भवानीपूर असो किंवा नवी दिल्ली, संकल्पाला परिणामात रूपांतरित करणे हीच अमित शाह यांची ओळख






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बंगालची ती भूमी, जी कधीकाळी रवींद्रनाथ टागोर यांच्या संगीताने, स्वामी विवेकानंद यांच्या आध्यात्मिक तेजाने आणि शरतचंद्र चट्टोपाध्याय यांच्या कालातीत साहित्यकृतींनी सुगंधित होती, ती अनेक दशकांपासून अशा शांततेत गुरफटली होती जी विकासाची नव्हे, तर ऱ्हासाची चाहूल देणारी होती. हा तोच पश्चिम बंगाल होता ज्याने कधीकाळी संपूर्ण देशाला दिशा दिली होती, परंतु काळाच्या ओघात तो अशा राजकीय अंधाऱ्या मार्गावर ढकलला गेला जिथे फक्त हिंसा आणि सूडाचे आवाज घुमत होते.

३५ वर्षे कम्युनिस्टांच्या ''रेड कॉरिडॉर''ने बंगालची औद्योगिक कणा कमकुवत केली आणि मागील १५ वर्षांत ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसच्या सत्तेखाली राज्य आणखी भ्रष्टाचार, तुष्टीकरण आणि अराजकतेच्या दलदलीत अडकले. जूट मिल्स बंद झाल्याने सकाळचे सायरन शांत झाले, उद्योगधंदे ठप्प पडले आणि रोजगाराच्या शोधात बंगालचा तरुण स्वतःची भूमी सोडण्यास भाग पडला. समृद्ध सांस्कृतिक ओळख असलेल्या या राज्यात रवींद्र संगीताच्या सुरांची जागा बॉम्बस्फोट आणि गोळीबाराच्या आवाजांनी घेतली. संदेशखालीपासून आर. जी. कर मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयापर्यंत महिलांच्या शोषणाच्या आणि प्रशासनिक निष्काळजीपणाच्या कथा बंगालच्या आत्म्याला घाव घालत होत्या.

परंतु २०२६ च्या कडक उन्हाळ्याने एक नवे पर्व लिहायला सुरुवात केली. भारतीय राजकारणातील आधुनिक ''चाणक्य'' म्हणून ओळखले जाणारे अमित शाह जेव्हा नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर ठाम निर्धार आणि डोळ्यांत भविष्याचा स्पष्ट आराखडा दिसत होता. त्यांनी ओळखले की बंगाल आता केवळ सत्तांतर नव्हे, तर हरवलेली ओळख परत मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. शाह यांची चाणक्यसदृश रणनीती केवळ सैद्धांतिक नव्हती; छत्तीसगड, हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्ली येथे तिचा प्रभाव दाखवून दिल्यानंतर त्यांनी ती आता बंगालच्या राजकीय भूमीवर उतरवली.

दिल्लीतील वातानुकूलित खोल्या मागे सोडून शाह यांनी बंगालच्या रस्त्यांनाच आपले केंद्र बनवले. सलग १५ दिवस त्यांनी राज्याच्या जनजीवनात स्वतःला झोकून दिलेजणू ते केवळ निवडणूक लढवत नव्हते, तर एका संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाच्या मोहिमेवर होते.
शाह यांच्या कार्यपद्धतीची सर्वात ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा अढळ निर्धार. राजकीय वर्तुळात असे म्हटले जाते की भवानीपूर असो किंवा नवी दिल्लीसंकल्पाला परिणामात रूपांतरित करणे म्हणजेच अमित शाह.

बंगालमध्ये भारतीय जनता पार्टी चा उदय हा एका दिवसाचा चमत्कार नसून, तो दशकभर चाललेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा परिणाम आहे. २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला केवळ ३ जागा मिळाल्या होत्या. मात्र शाह यांनी हार मानली नाही; त्यांनी शून्यातही संधी शोधायला सुरुवात केली. २०२१ पर्यंत त्यांच्या रणनीतीने रंग दाखवला आणि भाजपची ताकद ३ वरून ७७ जागांपर्यंत पोहोचली, ज्यामुळे ममता बॅनर्जी यांच्या अभेद्य किल्ल्यात पहिली मोठी भेग पडली. आणि आता २०२६ मध्ये २०७ जागांचा भव्य आकडा गाठणे हे त्यांच्या संघटन कौशल्याचे आणि ''बूथ मॅनेजमेंट''च्या शिखराचे प्रतीक ठरले.
निवडणुकीच्या रणांगणात शाह यांनी बंगालच्या भूगोलाला आपल्या रणनीतीच्या धाग्यांत गुंफले. ५० पेक्षा अधिक सभा आणि असंख्य रोड शोद्वारे ते केवळ भाषण करत नव्हते, तर बंगालच्या गौरवशाली भूतकाळाची आठवण करून देत होते, जो त्यांच्या मते तृणमूल काँग्रेसच्या ''सिंडिकेट राज'' आणि ''कट मनी'' संस्कृतीमुळे बाधित झाला होता. उत्तर बंगालच्या चहाच्या बागांपासून सुंदरवनच्या खाड्यांपर्यंत ''कमळ'' हा चर्चेचा केंद्रबिंदू बनला. त्यांनी अशी भक्कम संघटनात्मक रचना उभी केली की तृणमूल काँग्रेसचा कॅडर–आधारित प्रभाव कोसळू लागला.

व्यवस्थापनातील तज्ज्ञ शाह यांनी बंगालमधील प्रत्येक मतदान केंद्रावर आपली ''सायलेंट आर्मी'' तैनात केली होती. जिथे एकीकडे ममता बॅनर्जी सत्तेच्या आत्मविश्वासात दिसत होत्या, तिथे शाह शांतपणे त्या भागांत प्रवेश करत होते जिथे भाजप परंपरेने कमकुवत मानली जात होती. त्यांनी लोकांमध्ये हा ठाम विश्वास निर्माण केला की नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ''सोनार बांग्ला''चे स्वप्न साकार होऊ शकते. सभांमध्ये उमटणारी प्रचंड गर्दी याचेच प्रतीक होतीविकासाची भूक आता हिंसाचाराच्या भीतीवर आणि अराजकतेच्या थकव्यावर मात करत होती.

या निवडणूक लढतीतील सर्वात रोचक आणि ऐतिहासिक क्षण म्हणजे भवानीपूरमधील सामना. ममता बॅनर्जी यांचा अभेद्य गड मानल्या जाणाऱ्या या मतदारसंघात शाह यांच्या संघटन कौशल्याने परिस्थिती बदलली.
ही विजय केवळ भौगोलिक नव्हती; ती प्रतीकात्मक होतीजनतेचा रोष कितीही मजबूत राजकीय किल्ल्यांवर मात करू शकतो, हा संदेश देणारी.
''२०२६ मध्ये बंगाल भाजपाच्या ताब्यात येईल'' ही त्यांची भाकीत आता वास्तवात उतरली होती.
भ्रष्टाचाराविरोधातील त्यांची शून्य–सहिष्णुता भूमिका आणि मोदी सरकारच्या पायाभूत सुविधांवरील भरामुळे लोकांच्या मनात खोलवर प्रभाव पडला.
शेवटी ४ मे रोजी मतमोजणी सुरू झाल्यावर निकालांनी इतिहास घडवला. ''मोदी मॅजिक''ने जनतेची मने जिंकली, तर ''शाह फॅक्टर''ने त्या पाठिंब्याला मतांच्या प्रचंड लाटेत रूपांतरित केले. जवळपास पाच दशकांच्या राजकीय अंधारानंतर बंगालमध्ये भगव्याचा नवा सूर्योदय झाला.
ही विजय केवळ एका पक्षाची नव्हती, तर शोषण सहन करणाऱ्या माताबहिणींची आणि दडपलेल्या आकांक्षांसह जगणाऱ्या तरुणांची होती.
अमित शाह यांचा अढळ प्रयत्न, त्यांचे रणनीतिक कौशल्य आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर जनतेचा विश्वासया शक्तिशाली संगमाने या भव्य विजयाचा मार्ग मोकळा केला.बंगाल आता पुन्हा एकदा ''सोनार बांग्ला'' होण्याच्या नव्या प्रवासाला निघाला आहे.

(पान १ वरून)

## महिला परिचरांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

या कालावधीचे थकीत मानधन त्वरित जमा करावे. दर महिन्याच्या ५ तारखेच्या आत मानधन नियमितपणे जमा व्हावे. पगारवाढीच्या घोषणांची तात्काळ अंमलबजावणी करावी. प्राथमिक आरोग्य केंद्रांवरील दिवस पाळी (डे शिफ्ट) लावण्याची पद्धत बंद करावी. महिला परिचरांना सन्मानाची वागणूक मिळावी. दरवर्षी गणवेश व भाऊबीज भत्ता देण्यात यावा आणि प्रधानमंत्री अपघात विमा योजना लागू करण्यात यावी. पुढील आंदोलनाचा इशारा यावेळी बोलताना संघटनेच्या जिल्हाध्यक्षा कल्पना धनवटे आणि सीटूचे जिल्हा समन्वयक कॉम्रेड प्रवीण सोनवणे यांनी सांगितले की, जर प्रशासनाने त्वरित मागण्या मान्य केल्या नाहीत आणि थकीत मानधनाचा प्रश्न मार्गी लावला नाही, तर येणाऱ्या काळात राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. तसेच, आरोग्य भवन, मुंबई येथे धडक मोर्चा काढण्याचा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

या आंदोलनात अहमदनगर जिल्हा अध्यक्ष कल्पना धनवटे, सीटूचे जिल्हा समन्वयक कॉम्रेड प्रवीण सोनवणे, अकोला तालुका अध्यक्ष सविता काळे, राहता तालुकाध्यक्ष छाया थोरात, अहमदनगर तालुका अध्यक्ष प्रतिभा सोनवणे, पाथर्डी तालुका अध्यक्ष कांता गायकवाड, नेवासा तालुका सचिव मंदाताई अस्वले, उषाताई केदारी, शेवगाव तालुका अध्यक्ष प्रतिभा केसभट, राहुरी तालुका सचिव सुनिता गागरे, लता लिंगे, अनिता हजारे, रोहिणी ताई सोनवणे, रोहिणी धस यांच्यासह मोठ्या संख्येने महिला परिचर उपस्थित होत्या.

## जमिनीच्या वादातून पती–पत्नीवर जीवघेणा हल्ला

पोलीस हवालदार लाड पुढील तपास करत आहेत. गावांमध्ये जमिनीच्या वादातून वाढणारे हिंसक प्रकार पुन्हा एकदा समोर आले असून, अशा घटनांमुळे कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर येत आहे.

## भरधाव थारची रिक्षाला समोरून धडक

आहे. मागील महिन्यात एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या अपघातांमुळे वाहतूक ठप्प झाली होती. ट्रक–पिकअप धडक, ब्रेक निकामी होणे, तसेच वाहन उलटण्याच्या घटना येथे सातत्याने घडत आहेत. त्यामुळे ''आणखी किती निष्पाप जीव गेल्यावर प्रशासन जागे होणार?'' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महापौरांचे कडक आदेश

गेल्यानंतरही तीन ते चार तास पाणीपुरवठा विस्कळीत होतो. एका दिवशी तब्बल बारा तास वीजपुरवठा खंडित झाल्याने शहरातील अनेक भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती.

या समस्येवर तोडगा काढण्यासाठी विद्युत विभागाला पत्र देण्यात आले असून, पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विविध पर्यायी उपाययोजना राबविण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. शहरातील प्रत्येक भागात पाणीपुरवठा नियमित व वेळेवर होण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असे महापौरांनी सांगितले.या पाहणीवेळी इंजिनिअर गीते,इंजिनिअर ढगे यांच्यासह संबंधित विभागातील कर्मचारी उपस्थित होते. महापौरांच्या या हस्तक्षेपामुळे नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.